# ‘सातपाटील कुलवृत्तांत : महाराष्ट्रीय संस्कृतीचा पट उलगडून दाखविणारी कादंबरी’

**प्रा. रेणुका दिलीपराव गोंडचर (पुंडकर)**
संशोधन अभ्यासक,
धनवटे नॅशनल कॉलेज, नागपूर

---

८० च्या दशकातील महत्त्वाचे कथा कादंबरीकार म्हणून प्रा रंगनाथ पठारे यांचा नावलौकिक आहे. आपल्या खास पठारीशैलीत कथा कादंबऱ्यांचे लिखाण करून त्यांनी रखरखते समाजवास्तव मांडले आहे. त्यांची साहित्य लेखनाची सुरुवात काव्य लेखनाने झाली असली तरी त्यांचा मुख्य भर कथा-कादंबरी लेखनावरच असल्याचे दिसते. त्यातही अलीकडे ते कथेपेक्षाही कादंबरीकडे अधिक वळलेले दिसतात गेल्या ४० वर्षापासून त्यांनी अविरत लेखन करून मराठी साहित्याची सेवा केली आहे. ‘सातपाटील कुलवृत्तांत’ ही त्यांची चौदावी कादंबरी मराठी कादंबरी क्षेत्रात मैलाचा दगड ठरली. सुमारे वीस वर्षाच्या प्रदीर्घ विचार मंथनानंतर पठारेंनी ही कादंबरी साकारली आहे. या कादंबरीत सात पाटलांच्या कुळाचा वृत्तांत केंद्रस्थानी असून, फक्त कुळाचा इतिहासच ही कादंबरी सांगत नाही तर, एकूणच महाराष्ट्रीय संस्कृतीचा कुलवृतान्त आपल्यासमोर मांडते. डॉ. गणपत ढेंबरे म्हणतात,

“ इतिहास, समाजशास्त्र, अर्थशास्त्र, नीतिशास्त्र, भाषाशास्त्र, भूगोल, सांस्कृतिक विश्व, अध्यात्म या सर्वांना स्पर्श करणारी अभिजात कलाकृती म्हणजे सातपाटील कुलवृत्तांत ही कादंबरी होय”[१].

इ.स. १२ वे शतक ते २१ व्या शतकापर्यंत या कादंबरीचे कथानक आकार घेते. प्रस्तुत कादंबरीत एकूण सात नायक असून या कादंबरीतील नायिका महत्त्वाच्या ठरताना दिसतात. याचे कारण नायकाच्या जीवनाला वेगळा आकार देण्याचे काम नायिकांनी केले आहे. तसेच भारतीय समाज व्यवस्थेतील सर्व अंगांना स्पर्श करणारी ही कादंबरी संपूर्ण मानव जातीच्या सांस्कृतिक, अध्यात्मिक, भौगोलिक, विश्वावर प्रकाश टाकते. अठरा पगड जातींनी मिळून बनलेला समाज, स्त्री-पुरुष संबंध, मराठा-अफगान संबंध अशा अनेक गोष्टी कल्पित आणि वास्तवाच्या मिश्रणातून पठारेंनी या कादंबरीतून जिवंतपणे मांडल्या आहेत. प्रस्तुत कादंबरीत पठारेंनी सात वेगवेगळ्या कालखंडात सात नायक उभे करून, आपल्या कुळाचा शोध घेताना संपूर्ण महाराष्ट्रीय संस्कृतीचाच शोध घेण्याचा प्रयत्न केला आहे. श्रीपती हा सतपाटील घराण्याचा कुल पुरुष, त्याचा काळ १२८९ म्हणजे रामदेवराय जाधवांच्या सत्ताविलयाचा, याच काळात ब्राम्हणांचे वर्चस्व प्रचंड वाढलेले होते. हेमाद्री पंडित याने ‘चर्तुवर्गचिंतामणी’ नावाचा ग्रंथ लिहून समाज विघटनाची सुरुवात केली. व्रते, उद्यापने यांचा सुळसुळाट झाला. त्याचा नाहक त्रास सामान्य जनतेला होत होता.

अशातच व्रत, वैकल्ये, उद्यापने ह्या सर्व निरर्थक गोष्टी आहेत. असे श्री चक्रधर स्वामींनी प्रतिपादित केले. त्यांना मोठा प्रतिसाद मिळाला. अनेक ठिकाणी त्यांचा शिष्य संप्रदाय वाढला होता, ब्राम्हण-क्षत्रिय हे राजाविरुद्ध होते. यांचाच फायदा घेणारी परकीय आक्रमणे या काळात झाली. उल्लाउद्दीन खिलजी ची पैठण वरील स्वारी त्याचे उत्तम उदाहरण आहे.

पैठण जवळील डोंगरकिनी गावात राहणारा श्रीपती हा मेंढपाळ रानात आपल्या मेंढ्या चारत असतांना, रस्त्याने चाललेल्या मानक-याच्या मुलाला आपल्या मेंढीचे दुध पाजतो. ते बाळ खूप आजारी आणि भुकेले असते. मेंढीच्या देऊधामुळे मानकुर्यांच्या मुलाचे प्राण वाचतात. या छोट्या घटनेमुळे श्रीपतीचे सर्व आयुष्य बदलून जाते. आपल्या मेंढी व कुटुंब कंबील्यासह त्याचे पैठण नगरीत स्थलांतर होते. पुढे मानकर्यांच्या सेवेत रुजू होतो. त्याच्या अंगी असलेल्या प्रचंड स्वामिनिष्ठा व शूरता या वैशिष्ट्यांमुळेच, पुढे घडलेली कथा श्रीपतीला सर्वोच्च स्थान प्राप्त करून देते. अर्थात श्रीपती केशीराज एडके मानकरी यांचा अत्यंत विश्वासू माणूस बनतो खिलजी आल्याची आवई उठल्यावर आपल्या पत्नीची जबाबदारी ही मानकरी श्रीपतीवर टाकतो. मानक-याची बायको रोहिणी ही अत्यंत सुंदर व देखणी स्त्री श्रीपतीवर भाळते. दोघांमध्ये जवळीकता निर्माण होते दरम्यान मान-याच देऊळ बांधण्याचे स्वप्न आकाराला येतं श्रीपती आपल्या हुशारीने मानकर यांचे देऊळ बांधण्यापासून लोकांना परावृत्त करतो. या सर्व गोष्टींमधून श्रीपतीचा उत्कर्ष झालेला दिसतो. तो एक साधा मेंढपाळ असतो. आपण क्षत्रीय किंवा पठारे आहोत याची जाणीवही त्याला नसते. केवळ योगानेच उपकार झाल्यामुळे मिळालेला सन्मान हेच आपल्या ख-या अस्तित्वाची ओळख तो करून देतो. ही कथा सांगताना पठारेंनी लोकपरंपरेतील रसभरीत कथा ऐकण्याचा अनुभव वाचकांना करून दिला आहे. तसेच पौरुष्यहीन मानकरी, त्याची बायको रोहिणी, अनौरस बाळाचे असणे या सर्व बाम्बोरी पर्यंतच्या प्रवासातील गोष्टी पठारेंनी सूचकपणे मांडल्या आहेत. याचा पुढील सात पाटलांच्या इतिहासात संबंध दिसून येतो. एवढ्या सुंदर आणि साहसपूर्ण प्रसंगाची मांडणी पठारेंनी आपले कौशल्य पणाला लावून केली आहे.

पुढे साहेबरावची कथाही याच वांबोरी गावातून सुरू होते. वांबोरीच्या पाटलाच्या मुलीला पठाण उचलून नेतात. आणि गावातील ब्राह्मण-मराठा जातीतील सात मुलांनी तिला सोडवून आणण्यासाठी पठाणांचा खात्मा करणे. गावाची पाटीलकी सात घराण्यात आळीपाळीने वाटून देणे. साहेबरावचा साहेबराव सातपाटील होणे. त्याचे बहराम खानाला मारणे, त्याच्या बायकोच्या प्रेमात पडणे, आर्यानाचे आटेना होणं आणि तिच्या सोबतच लग्न करून साहेबराव व आरेना आदिलशाहीतील पुण्यात खराडी नावाचे गाव बसवतात. देशमुख याची सदन मिळवणं, साहेबरावची शिवराम बुवांशी मैत्री, शिवरामबुवांनी साहेबराव व आरेना यांना अफगाणिस्तानात जात असताना भेट म्हणून दिलेली विठ्ठल रुक्माईची मूर्ती अफगाणिस्तानात पोचवते. अशा घटनांच्या गुंतागुंतीतच दशरथ च्या आयुष्याचा कालखंड सुरू होतो.

पानिपतचे युद्ध दशरथ च्या आयुष्यातील महत्त्वाची घटना. दशरथ एखाद्या पठारांनासारखा उंच व गोरापान असतो एका अनपेक्षित घटनेने त्याला आपल्या आई-वडिल आणि बायकोला सोडून पळून जावे लागते. मजल दर मजल करीत, उपाशी तापाशी पडवत असताना ग्लानी येऊन तो पडतो, तुळसाबाई मुळे तो शुद्धीवर येतो. पुढे वाघाच्या तोंडात हात घालण्याचा पराक्रम करतो. त्यामुळे दत्ताची शिंदे च्या खाजगी सेवेत पोहोचण, पानिपतच्या युद्धात सहभागी होणं, गीलच्यांनी त्याला केंद्र करण, युद्धात मेलेल्या झोरावरच्या जागी झोरावर बनवून अफगाणिस्तानात जाणं, तिथे आपण मराठा आहोत अशी कबुली झोरावरच्या बायकोला म्हणजे आफियाला देण, आणि सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे साहेबराव व आर्यनाला भेट म्हणून दिलेली विठोबा रुक्मिणीची मूर्ती आफियाकडे असणे, आणि तिला सोबत घेऊनच दशरथ आणि अफिया भारतात येऊन करंजे गावी राहतात. सातपाटलांच्या चौथ्या पिढीतील जानरावचा कालखंड उत्तर पेशवाईचा आहे. दुसऱ्या बाजीरावाच्या सततच्या पडण्याला कंटाळून तो पेशव्याच्या सैन्यातून आपल्या मित्रासोबत निघून येतो वाटेत साल्पीनामक गावात तो थांबतो. आणि तेथेच पुढे गाव बसवून आपल्या कुटुंबासोबत रहीबसती दरम्यान आपल्या मुलीवर झालेल्या बलात्काराच्या घटनेने तो व त्याची बायको दोघेही सुन्न होतात. अशातच त्याच्या मुलीचा मृत्यू होण, बायकोचे ही अपघाती मरण होणे, जानरावाने आपल्या मुलीवर बळजोरीकरणा-या तोडमलच्या थोरल्या मुलाला ठार मारणे, या घटनेनंतर त्याची व्यवस्था मळयातील वस्तीवर जनावरांच्या गोठ्यात केली जाते. शेवटी अशा विपन्नावस्थेतच तो मरून जातो. पुढे ईस्ट इंडिया कंपनीच्या काळात जानरावाची दोन्ही मुलं रखमाजी त्याची बायको समिंदरा आणि पिराजी साल्पीतच राहतात. पिराजी रंगाने गोरा, उंच, एखाद्या पठाणासारखा, कोणालाही न जुमानणारा, तो माणकेश्वरच्या यात्रेतून उल्की नावाच्या कोल्हाट्याच्या पोरीला पळवून गावाबाहेर वस्ती करून राहतो. तो दरोडे घालून खूप धन कमावतो. संपूर्ण गावात त्याची वचक असते. पण अचानक त्याच्यावर कुणीतरी विष प्रयोग करून त्याला मारतो. त्याचा संशय आपल्या बायकोवर म्हणजे उल्फीवर येऊ नये म्हणून तो मरता मरता तिला पळून जायला सांगतो. ती आपल्या मुलाला म्हणजे जालंदरला घेऊन एका इंग्रज अधिकाऱ्याच्या आश्रयाला येते. त्या अधिकाऱ्याचे नाव अँथनी ब्लॅकस्मिथ तिला पाहता क्षणी तो तिच्या प्रेमात पडतो. आणि तिच्याशी लग्न करून इंग्लंडला घेऊन जातो. उल्फी पासून त्याला मूल होत नाही म्हणून तो पिराजीच्या मुलाचाच आपला मुलगा मानतो.

सात पाटील कुळाचा पुढचा नायक शंभूरावा असून त्याचा काळ पहिल्या व दुसऱ्या महायुद्धाच्या दरम्यानचा आहे. त्याला पाच मुलं व दोन मुली आहेत. आपली पत्नी असलेल्या तेजबाई कडून झालेली मुलं वाचत नाहीत म्हणून स्वतः तेजबाईच शंभूरावचे दुसरे लग्न लावून देते. शिवाय त्याची देऊबाई नावाची प्रेमाची बाई ही आहे. तिच्या पासूनही त्याला संतती झालेली आहे. गावातील रामचंद्र पाटलाच्या मुलीने मुसलमान मुलासोबत पळून जाणे, तिला शोधून तिचे लग्न इंदोरला लावून देणे, पाटलाच्या बायकोचा मृत्यू होण, तेजाबाईचे पाटलांना मुलगी शोधून दुसरी बायको करून देणे, आपल्या ओळखीवर गावातल्या

मुसलमान व राधुमहाराच्या मुलांना शंभूरावाचे धंद्याला पाठवणे, मुंबई येथे राजूशेठ यांच्या इंग्रज मित्र असलेल्या अँथनीशी शंभूराजे भेट होणे, तेथे अँथनी ची बायको म्हणून उर्फी हिच्याशी भेट होणे, उर्फी कडून त्याला गुप्त खजिन्याची माहिती मिळणे, शंभूराव व देऊबाईच्या मुलाची भांडणे, देऊ बाईचा मृत्यू, तुळाजी व मानकोजीचे दुसऱ्या महायुद्धात लढणे, परतल्यावर त्याची लग्ने, त्यातून तान तणाव निर्माण होणे, शंभूराज्याच्या मुलीचे परपुरुषासोबत पळून जाणे, याचा प्रचंड धक्का त्यास बसणे, त्यातच शंभूराव चा मृत्यू होतो. शंभूराव चा नातू देवनाथ सातपाटील हा सात पाटील कुळाचा सातवा प्रतिनिधी आहे. तो आजचा मान्यता प्राप्त लेखक आहे. तोच कादंबरीचा निवेदक आणि लेखकही आहे. भारतीय लेखकांच्या शिष्ट मंडळाचा सदस्य म्हणून इंग्लंडला गेल्यावर त्याला अनेक धक्के बसतात. तेथे त्याची भेट दशरथ आणि अफियाची मुलगी असलेली भिमबाई हिचा वंशज असलेल्या रिचर्ड लेसिंगशी होणे , अँथनी ब्लॅकस्मिथ हा दुसरा ब्रिटिश नातेवाईक भेटणे, या दोन नातेवाईकांच्या भेटीतून आपल्या कुळीचे इंग्लंड खेरीज अफगाणिस्तानात देखील कनेक्शन आहे हे देवनाथला समजण. या सर्व घटनांमधून देवनाची आपल्या कुळाचा शोध घेण्याची वृत्ती अधिक प्रबळ होऊन तो साली, करंजे, खराडी या गावात जाऊन माहिती मिळवतो. त्याला बांबोरीत सातपाटलांच्या कुळाचा उलगडा होतो. कादंबरीच्या सुरुवातीला धार्मिक विधी करणारा ब्राह्मण आणि देवनाथ यांच्यातील संवाद हा लेखकाने घेतलेला आपल्या पूर्वजांच्या शोधातील महत्त्वाचा भाग आहे. काळाच्या सातशे वर्षे मागे जाऊन आपल्या पूर्वजांचा शोध घेत असताना लेखकांने काळाचा विस्तृत पट वाचकांसमोर उभा केला आहे. त्यात विविध वृत्ती प्रवृत्तीची माणसे, घटना, एकाच वेळी अनेक लहान मोठ्या स्त्री-पुरुषांची मानसिकता लेखकाने रेखाटली आहेत. एका स्त्रीची कितीतरी रूपे कादंबरीत आलेली आहेत त्या त्या काळातील अनेक सामाजिक, राजकीय, कौटुंबिक बदल, असंख्य घटना, आघात, वंश विस्तार आणि स्थलांतर यातून कादंबरीतील काळ प्रवाही झाला आहे. या कुलवृत्तांताच्या निमित्याने पठारेंनी महाराष्ट्रीय संस्कृतीचा वेध घेण्याचा प्रयत्न केला असल्याचे दिसून येते. महाराष्ट्र व महाराष्ट्रा बाहेरील भूप्रदेश कादंबरी आला असला तरी या कादंबरीचे मुख्य केंद्र महाराष्ट्रातच आहे. याविषयी केदार काळवणे म्हणतात,

"महाराष्ट्रीय जगण्याची बहुस्थरीय रचना, वैविध्य पूर्ण जीवनरीत, मूल्यव्यवस्था श्रम, संस्कृती, ज्ञानव्यवस्था, लढाऊबाणा, युद्धशास्त्र, शेती आणि गावगाडा, अशा अनेक अंगांना स्पर्श करत ही कहाणी सर्वांची होऊन जाते. त्यामुळेच महाराष्ट्रीय समाजाच्या सांस्कृतिक जगण्याचा कुलवृत्तांत म्हणून या कादंबरीचा निर्देश करणे आवश्यक ठरेल."[२]

अर्थात विविध सात टप्प्यात घेतलेला हा कुळाचा शोध एकट्या लेखकाची कहाणी राहत नाही तर, सातशे वर्षातील महाराष्ट्रातील सांस्कृतिक स्थित्यंतरे, जीवनशैली तिच्यातून व्यक्त झाली आहेत, त्याचप्रमाणे महाराष्ट्रीय संस्कृतीचा वेध घेणाऱ्या या महाकादंबरीतून आपल्या संस्कृतीत संचिताचा

दस्तावेज पठारेंनी उलघडला आहे. म्हणूनच मराठी कादंबरी क्षेत्रात या कादंबरीचे महत्त्व अधिक आहे.

संदर्भ :

- ढेंबरे, डॉ. गणपत – नवी उर्जा देणारी कादंबरी' , सातपाटील कुलवृत्तांत – दिवाळी विशेषांक – २०२०, मुद्रली प्रकाशन श्रीरामपूर, पृ.क्र.१७४
- कालवणे, केदार – 'महाराष्ट्रीय संकृतीचा कुलवृत्तांत;' सातपाटील कुलवृत्तांत – दिवाळी विशेषांक – २०२० तत्रैय, पृ.क्र. १३५